**वृक्षारोपण व वृक्ष पुनर्जीवन उपक्रम : (दि. १० ते १६ फेब्रुवारी २०१८)**

विशेष शिबीर कालखंडात विशेष म्हणजे दि. १३ फेब्रुवारी २०१८ रोजी या दिवशी महाविद्यालयाच्या शिबिरार्थी स्वयंसेवकांनी ग्रामस्थांना सोबत घेत मौजे. भोकरंबा ता. रेणापूर या गावात प्रत्येक गल्लीमध्ये व गावाच्या मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूला वृक्षांची लागवड केली. ही वृक्ष लागवड करण्यासाठी लातूरच्या वनविभाग कार्यालयाने वृक्षरोपांची पूर्तता करून मोलाचे सहकार्य केले. तसेच लातूर वृक्ष समितीने देखील वृक्षरोपांचा पुरवठा मोठया प्रमाणावर करत स्वतः उपस्थित राहून वृक्षलागवड करण्यास बहूमोल सहकार्य केले. शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे सुवर्ण महोत्सवी वर्ष असल्यामुळे राजर्षी शाहू महाविद्यालयातील रासेयोच्या विशेष युवक शिबिराच्या निमित्ताने या गावात व गाव परिसरात जवळपास १००१ वृक्ष रोपांची लागवड केली. तसेच गावात रस्त्याच्याकडेला लावलेल्या वृक्षांना पाणी टाकण्यासाठी सरपंच श्री. राम हरी गोरे, उपसरपंच श्री. सुदिप भिसे, डॉ. शिवाजी भिसे, सौ. आशाताई भिसे व ग्रामपंचायतीच्या इतर सदस्यांची मदत घेत टँकर ने सिंचनासाठी विशेष व्यवस्था केली. ग्रामस्थांना वृक्षांचे महत्व पटवून देत घरातील प्रत्येक व्यक्तिला घरासमोरचे वृक्ष दत्तक घ्यायला लावले व त्यांच्यावर दररोज पाणी टाकून ते वृक्ष जोपासण्याची जबाबदारी ग्रामस्थांवर सोपवली. या वृक्षारोपण कार्यक्रमात लातूर वृक्ष समितीचे सदस्य दक्ष नागरिक समन्वयक श्री. सुपर्ण जगताप, लातूरचे नगरसेवक श्री. सय्यद इमरान, डॉ. पवन लड्डा, डॉ. बोरगावकर, श्री. महेश बिडवे, सौ. आशाताई भिसे, डॉ. शिवाजी भिसे, सरपंच रामहरी गोरे, उपसरपंच श्री. सुदिप भिसे, ग्रामसेवक डि.व्ही. गायकवाड, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. साळुंके, उपप्राचार्य एम. एच. गव्हाणे, रासेयोचे कार्यक्रमाधिकारी डॉ. के.डी. सावंत, प्रा. व्हि. ए. गवळी, डॉ. पी.जी. कावळे, प्रा. सुदर्शन पाटील, इतर प्राध्यापक, ग्रामस्थ, रासयोच्या शिबिरार्थी स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

**वृक्ष दिंडीचे आयोजन : (दि. १० व १६ फेब्रुवारी २०१८)**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष युवक शिबिराच्या उद्घाटन कार्यक्रमापूर्वी दि. १० फेब्रुवारी २०१८ रोजी व समारोप कार्यक्रमाप्रसंगी दि. १६.०२.२०१८ रोजी वृक्ष दिंडीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. समारोप कार्यक्रमाच्या दिवशी सकाळी १०.०० वाजता मोठया प्रमाणात पाहुण्यांच्या ग्रामस्थांच्या व रासेयो शिबिरार्थी स्वयंसेवकांच्या सहभागातून वृक्ष दिंडी काढण्यात आली. पालखीमध्ये रोप वाटिका ठेवून प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष, डॉ. पी. आर. देशमुख व लातूर ग्रामीण चे आमदार श्री. त्र्यंबक नानासाहेब भिसे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. साळुंके, डॉ. शिवाजी भिसे, सौ. आशाताई भिसे यांच्या शुभ हस्ते वृक्ष दिंडीची सुरूवात करण्यात आली.

या प्रसंगी टाळ, मृदंग यांच्या गजरात सर्व मौजे भोकरंबा गावात वृक्ष दिंडी काढण्यात आली. या समयी ग्रामस्वच्छता, शौचालयाचे महत्त्व, वनीकरणाचे संदेश देत, झाडे लावा-झाडे जगवा असे आव्हान स्वयंसेवकांच्या वतीने ग्रामस्थांना करण्यात आले. वृक्ष दिंडी यशस्वीरित्या सफल करण्यासाठी उपप्राचार्य डॉ. एम. एच. गव्हाणे, रासेयो चे कार्यक्रमाधिकारी डॉ. के.डी. सावंत, डॉ. पी. जी. कावळे, प्रा. विजय गवळी, सरपंच श्री. रामहरी गोरे उपसरपंच श्री. सुदीप भिसे, ग्रामस्थ व रासेयोच्या शिबिरार्थी स्वयंसेवकांनी विशेष सहकार्य केले.

